**MHRT**030020002022

दाखल दिनांक :- १८/१०/२०२२

नोंदणी दिनांक :- १८/१०/२०२२

निकाल दिनांक :- **१९/०८/२०२३**

कालावधी :- ०० वर्षे १० महिने ०१ दिवस

**भाग 'अ'**

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

**रत्नागिरी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**

**[तेजश्री रा.गुरव, ६ वे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी रत्नागिरी यांचेसमोर]**

**[जाहीर दिनांक १९/०८/२०२३]**

**निशाणी क्र.७ लगत**

| | |
|---|---|
| खटला क्रमांक :- | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १४०३/२०२२** |
| गुन्हा रजि. क्रमांक<br>व पोलीस ठाणे :- | **गुन्हा रजि. क्र.१६/२०२२,<br>राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी शहर,<br>ता. जि. रत्नागिरी.** |
| फिर्यादी :- | **महाराष्ट्र शासनकरीता<br>निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी शहर,<br>ता. जि. रत्नागिरी.** |
| प्रतिनिधीत्व:- | **श्रीमती पी.जे.पवार, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता** |
| आरोपी:- | **शहनाझ जमीर मुजावर,**<br>वय – ४५ वर्षे,<br>रा.मु. पो.क्रांतीनगर, झोपडपट्टी, रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी. |
| प्रतिनिधीत्व :- | **विधिज्ञ श्री.एस.आर.पारकर.** |

## भाग 'ब'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii) )

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | ३०/०१/२०२२ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झालेचा दिनांक | ३०/०१/२०२२ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | १८/१०/२०२२ |
| आरोपी विरुध्द दोषारोप ठेवलेचा दिनांक | ३०/०६/२०२३ |
| पुरावा नोंदविणेस प्रारंभ झालेचा दिनांक | १०/०८/२०२३ |
| न्यायनिर्णयाचा आरक्षित दिनांक | --- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | **१९/०८/२०२३** |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाचा दिनांक | लागू नाही. |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर खुले केलेची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **शहनाझ जमीर मुजावर** | फौ.प्र.सं. का.कलम ४१अ(१) प्रमाणे आरोपीला नोटीस दिली. | दि.२८/ ०३/ २०२३ | महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) | निर्दोष मुक्त केले | लागु नाही | निर्दोष मुक्त केलेने लागु नाही. |

## भाग 'क'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii) )

### साक्षीदारांची यादी

**अ. सरकारी**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| अ.सा.१ | महेश मधुकर पाटील | पंच साक्षीदार | ७ लगत. |

**ब. बचावाचे साक्षीदार – नाही.**

**क. न्यायालयीन साक्षीदार– नाही.**

### सरकारी / बचाव / न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

**अ. सरकारी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | ८ | घटनास्थळाचा पंचनाम्यावरील अनुक्रमांक १ येथील साक्षीदाराची सही |

**ब. बचाव– नाही.**

**क. न्यायालयीन निशाण्या– नाही.**

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | -- | सुमारे १० लिटर मापाचा प्लॅस्टिक कॅनमध्ये अंदाजे ७ लिटर गावठी हातभट्टीची दारु त्याची कॅनसह किं. सु. ४००/- |
| २ | -- | एक प्लॅस्टिक बादली किं.सु. ५०/- |
| ३ | -- | ४ काचेचे ग्लासे किं.सु.४०/- |

## न्या य नि र्ण य

## (जाहिर दिनांकः–१९/०८/२०२३)

प्रस्तुतचा खटला आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५–(ई) या अपराधासाठी चालविण्यात आला.

**खटल्याचा सारांश असा की,**

२. अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, दिनांक ३०/०१/२०२२ रोजी ९.३० वाजता अगर त्या सुमारास मौजे क्रांतीनगर गावचे हद्दीत झोपडपट्टी येथे तात्पुरत्या झोपडीत आरोपीचे ताब्यात सुमारे १० लिटर मापाचा प्लॅस्टिक कॅनमध्ये अंदाजे ७ लिटर गावठी हातभट्टीची दारु त्याची कॅनसह किं. सु. ४००/–, एक प्लॅस्टिक बादली किं.सु.५०/–, ४ काचेची ग्लासे किं.सु. ४०/– असा एकुण ४९०/– रुपयाचा मुद्देमाल अनाधिकाराने बाळगले स्थितीत मिळून आली.

३. तदनंतर फिर्यादीने राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी शहर, ता. जि. रत्नागिरी येथे आरोपी विरुध्द फिर्याद दिली. त्याप्रमाणे राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी शहर, ता.जि.रत्नागिरी येथे गुन्हा रजि. क्र.१६/२०२२ ने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये आरोपी विरुध्द अपराध नोंदविणेत आला. सदर अपराधा संदर्भात के.ए.पाटील, प्रभारी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी शहर यांनी तपास केला. तपासा दरम्यान आरोपी विरुध्द पुरावा मिळुन आल्याने आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीवरती अपराधाचा तपशील (निशाणी क्र.७) निश्चित केला. आरोपीने अपराध नाकारुन संपरीक्षा चालविणेची विनंती केली. आरोपीचा अपराध सिध्द करणेसाठी अभियोग पक्षातर्फे 'भाग क' मध्ये नमूद केलेप्रमाणे कागदोपत्री पुरावे दाखल

केले व साक्षीदार तपासले आहेत. पुरेशी संधी देवूनही इतर साक्षीदारांना हजर ठेवण्यात अभियोगपक्ष अपयशी ठरल्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपी विरुध्द पुरावा न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविणेत आले नाही.

५. सरकारी वकील श्रीमती पी. जे. पवार व आरोपीतर्फे वकील श्री. एस. आर. पारकर यांचा युक्तीवाद ऐकला.

६. साक्षीदारांचे जाबजबाब आणि प्रकरणाचा अभिलेख पहाता सदर प्रकरणात खालील मुद्दे निघतात. ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबित केले आहे काय कि, दिनांक ३०/०१/२०२२ रोजी ९.३० वाजता अगर त्या सुमारास मौजे क्रांतीनगर गावचे हद्दीत झोपडपट्टी येथे तात्पुरत्या झोपडीत आरोपीचे ताब्यात सुमारे १० लिटर मापाचा प्लॅस्टिक कॅनमध्ये अंदाजे ७ लिटर गावठी हातभट्टीची दारु त्याची कॅनसह किं. सु. ४००/-, एक प्लॅस्टिक बादली किं.सु.५०/-, ४ काचेची ग्लासे किं.सु. ४०/- असा एकुण ४९०/- रुपयाचा मुद्देमाल अनाधिकाराने बाळगले स्थितीत मिळून आली व त्याद्वारे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला? | **... नकारार्थी** |
| २. | काय आदेश ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करणेत येते.** |

## कारणमिमांसा

७. आरोपीवरील गुन्हा शाबितीकरिता अभियोगपक्षातर्फे पंच – महेश मधुकर पाटील (अ.सा. १) या साक्षीदारांना निशाणी ७ सोबत तपासले आहे.

**मुद्दा क्रमांक १ व २ करिता –**

**घटनेबाबत :**

८. अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, दिनांक ३०/०१/२०२२ रोजी ९.३० वाजता अगर त्या सुमारास मौजे क्रांतीनगर गावचे हद्दीत झोपडपट्टी येथे तात्पुरत्या झोपडीत आरोपीने तिचे ताब्यात सुमारे १० लिटर मापाचा प्लॅस्टिक कॅनमध्ये अंदाजे ७ लिटर गावठी हातभट्टीची दारु त्याची कॅनसह किं. सु. ४००/–, एक प्लॅस्टिक बादली किं.सु.५०/–, ४ काचेची ग्लासे किं.सु. ४०/– असा एकुण ४९०/– इत्यादी मुद्देमाल अनाधिकाराने बाळगला.

९. दिनांक ३०/०१/२०२२ रोजी ९.३० वाजता अगर त्या सुमारास मौजे क्रांतीनगर गावचे हद्दीत झोपडपट्टी येथे छापा टाकला हे सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी अथवा छाप्यामध्ये हजर असणाऱ्या इतर पोलिस अधिकारी यांची साक्ष नोंदविलेली नाही.

**मुद्देमाल जप्तीबाबत :**

१०. अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, दिनांक ३०/०१/२०२२ रोजी ९.३० वाजता अगर त्या सुमारास मौजे क्रांतीनगर गावचे हद्दीत झोपडपट्टी येथे तात्पुरत्या झोपडीत आरोपीने तिचे ताब्यात सुमारे १० लिटर मापाचा प्लॅस्टिक कॅनमध्ये अंदाजे ७ लिटर गावठी हातभट्टीची दारु त्याची कॅनसह किं. सु. ४००/–, एक प्लॅस्टिक बादली

किं.सु.५०/–, ४ काचेची ग्लासे किं.सु. ४०/– असा एकुण ४९०/– इत्यादी मुद्देमाल अनाधिकाराने बाळगला. सदरचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त केल्याची बाब सिध्द करण्यासाठी सरकार पक्षातर्फे पंच – महेश मधुकर पाटील (अ.सा.क्र.१) यांना निशाणी ७ लगत तपासण्यात आले.

**११.** अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेल्या पंच – महेश मधुकर पाटील (अ.सा. १), यांनी त्यांच्या साक्षीत दिनांक ३०/०१/२०२२ रोजी ते पंचनाम्यासाठी कुठेही गेले नसल्याचे सांगितले. तसेच सदर पंचनाम्याचा मजकुर त्यांनी वाचून पाहिलेला नाही, त्यातील मजकुर काय आहे याची त्यांना माहीती नाही, त्या सहया कशाबद्दल घेतल्या याची त्यांना माहिती नाही, त्यांना पंचनाम्यावरील मजकूर वाचुन दाखवला असता तो त्याच्या म्हणण्याप्रमाणे नाही असे सांगितले. त्यांनी त्यांचे साक्षीत पंचनाम्यातील मजकूराबाबत काही माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहाय्य न केल्याने त्यांची साक्ष आरोपीवरील गुन्हा शाबीत करण्यासाठी विचारात घेता येणार नाही.

**१२.** सदर प्रकरणात छाप्यामध्ये सहभागी असलेल्या इतर पोलिसांची, फिर्यादी, नमुना वाहक अगर तपासीक अधिकारी यांची साक्ष नोंदविणे आवश्यक होते. परंतु, अभियोग पक्षाने पुरेसी संधी देवूनही या प्रकरणात अशा एकही साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली नाही. तसेच, पंचनाम्यावरील पंच–महेश मधुकर पाटील (अ.सा.१) यांनी पंचनाम्याबाबत काहीही माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहाय्य केलेले नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा तथा सदर छाप्याची बाब ही योग्य त्या पुराव्यानिशी शाबित झालेली नाही. त्यामुळे कथित छापा संशयास्पद वाटतो.

**१३.** त्यामुळे अशा प्रकारचा छापा त्यांनी टाकला होता व आरोपीच्या ताब्यातून

सुमारे १० लिटर मापाचा प्लॅस्टिक कॅनमध्ये अंदाजे ७ लिटर गावठी हातभट्टीची दारु त्याची कॅनसह किं. सु. ४००/–, एक प्लॅस्टिक बादली किं.सु.५०/–, ४ काचेची ग्लासे किं.सु. ४०/– असा एकुण रुपये ४९०/– असा मुद्देमाल जप्त केला, असे चर्चेकरीता जरी मानले तरी या बाटल्यांमधील द्रव हा दारुच होता याचे शाबीतीसाठी सदर नमुने प्रयोगशाळेत पाठविणाऱ्या नमुना वाहकाची साक्ष नोंदविणे आवश्यक होते परंतु, अशा इसमाची साक्ष नोंदवलेली नाही. तसेच रासायनिक परिक्षणाचा अहवाल दाखल नसलेने आरोपीच्या ताब्यातुन जप्त केलेला मुद्देमाल ही दारुच आहे, हे शाबीत होत नाही. या प्रकरणातील तपासीक अधिकारी यांचीही साक्ष न नोंदवल्यामुळे सदर नमुने हे रासायनिक विश्लेषणाकामी पाठविले होते याबाबत देखील संशय निर्माण होतो. अशा परिस्थीतीत छापा टाकल्याचे व आरोपीच्या ताब्यातून सुमारे १० लिटर मापाचा प्लॅस्टिक कॅनमध्ये अंदाजे ७ लिटर गावठी हातभट्टीची दारु त्याची कॅनसह किं. सु. ४००/–, एक प्लॅस्टिक बादली किं.सु.५०/–, ४ काचेची ग्लासे किं.सु.४०/– असा एकुण ४९०/–रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आल्याचे शाबीत झाले आहे असे थोडया वेळाकरीता मानले तरी त्यामधील द्रव हा दारुच होता हा दाखवणारा कसलाही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही.

**१४.** थोडक्यात, अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे घटनास्थळी छापा टाकल्याचे, आरोपीच्या ताब्यातुन वर नमुद मुद्देमाल जप्त केल्याचे, सदरचा मुद्देमाल रासायनिक परिक्षणाकरीता प्रयोगशाळेत पाठविल्याचे, तसेच आरोपीच्या ताब्यातुन जप्त केलेला मुद्देमाल ही दारु असल्याचे शाबीत करण्यास अभियोगपक्षास पुर्णपणे अपयश आलेले आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविलेले असून मुद्दा क्रमांक २ करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **शहनाझ जमीर मुजावर** यांची महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम १९४९ कायदा ६५–ई खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते. त्याला मुक्त करण्यात येते.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी १५,०००/– रुपयांचे बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत सात दिवसांचे आत सादर करावे.

४. आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेल्या सुमारे १० लिटर मापाचा प्लॅस्टिक कॅनमध्ये अंदाजे ७ लिटर गावठी हातभट्टीची दारु त्याची कॅनसह किं. सु. ४००/–, एक प्लॅस्टिक बादली किं.सु.५०/–, ४ काचेची ग्लासे किं.सु. ४०/– असा एकुण रुपये ४९०/– इत्यादी मुद्देमाल अपील कालावधी संपल्यानंतर संबंधीत अधिकारी, मा. जिल्हा दंडाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणेकामी पाठविणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

TEJASHRI RAJENDRA GURAV
Digitally signed by TEJASHRI RAJENDRA GURAV
Date: 2023.08.22 15:53:12 +0530

**दिनांक– १९/०८/२०२३** **( तेजश्री रा. गुरव )**

**६ वे न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, रत्नागिरी.**